SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 CoE Office: 0231-2609067
B.A. Exam. Section: 0231-2609116 FAX: 0091-0231-2690655
Website: www.unishivaji.ac.in Email:ba.section@unishivaji.ac.in
'A++' Re-accredited by NAAC (2014) With CGPA-3.16
coe@unishivaj.ac.in

---

संदर्भ क्र: शिवाजी वि/ऑन परीक्षा/एस.सी.एल/४८८ दिनांक - १०/०३/२०२२

विशेष लक्षं - **Resource Geography of Maharastra. OR Concepts in Tourism Geography** हया विषया संदर्भात सत्र ३ साठी असणारी महाविद्यालये.

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संबंधित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:- बी.ए. भाग २ सत्र ३ मधील पर्यटन भूगोल मधील संकल्पना/महाराष्ट्र साधन संपत्तीचा भूगोल या विषयाच्या फेर परीक्षेबाबत.

महोदय/महोदया,

दिनांक ०९/०३/२०२२ रोजी दुपारी १२.३० ते ०१.३० वाजता Resourse Geography of Maharashtra (महाराष्ट्राच्या साधन संपत्तीचा भूगोल)/ Concepts in Tourism Geography (पर्यटन भूगोल मधील संकल्पना) (७३३४१) या विषयाच्या ऑनलाईन परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. तथापी सदर परीक्षेवेळी विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने केवळ महाराष्ट्राच्या साधन संपत्तीचा भूगोल या विषयाची एकच प्रश्नपत्रिका तांत्रिक अडचणीमुळे उपलब्ध झाली होती. याबाबत विद्यापीठास प्राप्त झालेल्या महाविद्यालयांच्या निवेदना नुसार सदर परीक्षेवेळी पर्यटन भूगोल मधील संकल्पना हा विषय असणा-या विद्यार्थ्यांनीही महाराष्ट्राच्या साधन संपत्तीचा भूगोल या विषयाची उपलब्ध प्रश्नपत्रिका अनावधानाने सोडविली आहे. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे महाराष्ट्राच्या साधन संपत्तीचा भूगोल या विषयाचे गुण रद्द करुन पर्यटन भूगोल मधील संकल्पना/महाराष्ट्राच्या साधन संपत्तीचा भूगोल या विषयाची नव्याने परीक्षा घेण्यात यावी अशी विनंती संबंधित महाविद्यालयाकडून करण्यात आली आहे. या संदर्भात आपणास कळविण्यास येते की,

१. दि. ०९/०३/२०२२ रोजी दुपारी १२.३० ते १.३० या वेळेत झालेली महाराष्ट्र साधनसंपत्तीचा भूगोल या विषयाची परीक्षा रदद करण्यात येत आहे.
२. दिनांक १३/०३/२०२२ रोजी दुपारी १२.३० ते १.३० या वेळेत पर्यटन भूगोल मधील संकल्पना/ महाराष्ट्र साधनसंपत्तीचा भूगोल या विषयाची फेर परीक्षा घेण्यात येईल. तसेच सदर विषयाशी संबंधित सर्व विद्यार्थ्यांनी ही परीक्षा द्यावयाची असून संबंधित विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करण्यात यावे, यासाठी पूर्वीचेच युझर आय डी व पासवर्ड वापरावयाचे आहेत.
३. विद्यार्थ्यांच्या लॉगिन मध्ये पर्यटन भूगोल मधील संकल्पना/ महाराष्ट्र साधनसंपत्तीचा भूगोल दोन्ही पेपर उपलब्ध करून दिले जातील. या दोन पेपर पैकी एक पेपर काळजीपूर्वक निवडून सोडवावयाचा आहे.
४. सदर विषयाची दि. १३/०३/२०२२ रोजी परीक्षा झाल्यानंतर पुन्हा पुर्नपरीक्षा घेतली जाणार नाही सदर परीक्षेला जे विद्यार्थी अनुपस्थित राहतील अशा विद्यार्थ्यांचा निकाल गैरहजर घोषित करण्यात येईल.
५. सर्व सबंधित महाविद्यालयांनी पर्यटन भूगोल मधील संकल्पना/महाराष्ट्र साधन संपत्तीचा भूगोल या विषयाच्या परीक्षेबाबत संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास हे पत्र आणण्यात यावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
प्र- संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत - १. परीक्षक नियुक्ती विभाग
२ आय टी. सेल विभागास